२/०५

महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण, १९९६
कुस्ती कलेचा विकास
कुस्तीगीरांना मानधन.

1649

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : राक्रीधो-१०९६/प्र.क्र. ३३०/क्रीयुसे-१,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ जुलै १९९७

वाचा :—शासन निर्णय क्र.-पीएचई-१०९३/प्र. क्र. १४८/क्रीयुसे-१, दिनांक १७ सप्टेंबर १९९४.

**शासन निर्णय:**

राज्यातील कुस्तीकलेची परंपरा जोपासण्यासाठी तसेच कुस्तीगीरांना त्यांच्या गुणांचा विकास होण्यास प्रोत्साहन देण्यासाठी मानधन देण्याची योजना राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेमार्फत दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या अधिवेशनात माती व गादी विभागात प्रत्येक वजन गटातील प्रथम सहा क्रमांकाच्या कुस्तीगीरांना मानधन देण्यास शासनाने यापूर्वीच मान्यता दिली आहे. सहा क्रमांकानंतरचे कुस्तीगीर या मानधनापासून वंचीत होत असल्याने तसेच राज्याच्या सर्व भागात कुस्ती कलेचा विकास व्हावा या दृष्टीने अशा कुस्तीगीरांनाही शासनाने मानधन द्यावे अशी मागणी कुस्ती क्षेत्रातील मान्यवर व्यक्तिंकडून सातत्याने येत होती.

राज्याच्या क्रीडा धोरणानुसार माती व गादी विभागातील प्रत्येक वजन गटाच्या प्रथम सहा क्रमांकानंतरच्या सहभागी होणाऱ्या कुस्तिगीरांनाही अनुक्रमे प्रत्येकी दरमहा रु. १०० व रु. २०० मानधन देण्यास शासन मान्यता देत आहे. माती व गादी विभागातील वजनगटनिहाय प्रथम सहा क्रमांकाच्या कुस्तीगीरांना तसेच सहा क्रमांकानंतरच्या सहभागी होणाऱ्या सर्व कुस्तीगीरांना द्यावयाच्या दरावाबतचे सुधारित विवरणपत्र सोबतच्या परिशिष्टात दर्शविण्यात आले आहे.

२. संचालक, क्रीडा व युवकसेवा, म. रा. पुणे-१ यांना महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेकडून प्राप्त यादीतील कुस्तीगीरांना मानधन मंजूर करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

३. यावर होणारा खर्च त्या त्या आर्थिक वर्षाच्या मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागविण्यात यावा आणि "२२०४-क्रीडा व युवकसेवा-१०४-क्रीडा व खेळ" (आठ) (ए) (एक) "कुस्ती खेळाचा विकास करण्याकरिता आर्थिक सहाय्य-४०-शिष्यवृत्त्या व विद्यावेतन-(२२०४-०३९-३) योजनेतर या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

४ हे आदेश शासन निर्णयाच्या दिनांकापासून पुढील आदेश होईपर्यंत अंमलात राहतील.

हा शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. प्र. क्र. ७३८/व्यय-११, दिनांक २२ जुलै १९९७ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(रमेशचंद्र कानडे),
सचिव,
महाराष्ट्र शासन.

# परिशिष्ट

शासन निर्णय क्र. राक्रीधो-१०९६/प्र.क्र. ३३०/क्रीयुसे-१, दिनांक ३१ जुलै १९९७ चे सहपत्र.

वजन गटनिहाय कुस्तीगारांसाठी मानधन दराचा तपशिल.

माती विभाग

| वजनगट किलो (१) | १ ला दरमहा रुपये (२) | २ रा दरमहा रुपये (३) | ३ रा दरमहा रुपये (४) | ४ था दरमहा रुपये (५) | ५ वा दरमहा रुपये (६) | ६ वा दरमहा रुपये (७) | ६ व्या क्रमांकानंतर दरमहा रुपये (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८२ चे वर | ७५० | ६०० | ५०० | ४०० | ३०० | २०० | १०० |
| ८२ ७४ ६८ | ७०० | ५५० | ४५० | ३५० | २५० | १५० | १०० |
| ६२ ५७ ५२ ४८ | ५०० | ४५० | ३५० | २५० | १५० | १०० | १०० |

गादी विभाग

| वजनगट किलो (१) | १ ला दरमहा रुपये (२) | २ रा दरमहा रुपये (३) | ३ रा दरमहा रुपये (४) | ४ था दरमहा रुपये (५) | ५ वा दरमहा रुपये (६) | ६ वा दरमहा रुपये (७) | ६ व्या क्रमांकानंतर दरमहा रुपये (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८२ चे वर | १००० | ७५० | ६०० | ५०० | ४०० | २५० | २०० |
| ८२ ७४ ६८ | ९०० | ७०० | ५५० | ४५० | ३५० | २०० | २०० |
| ६२ ५७ ५२ ४८ | ७०० | ५५० | ४५० | ३५० | २५० | २०० | २०० |